**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १८/२०१५ मधील निशाणी क्र.४३ वरील आदेश</u>**

(बबाबाई यादव वि. शशिकांत रायकर व इतर)

सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक ५ अ यांच्या विरुध्द दावा एकतर्फा आदेश रदद करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व वादीचे म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींच्या विद्वान विधिज्ञाचा युक्तिवाद ऐकला.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा वाटपासाठी, जाहीर ठराव, निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ५ अ यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश दिनांक २९.११. २०२१ रोजी झालेला आहे.

०४. साक्षीसमन्स बजावले त्या कालावधीत कोरोना १९ या आजाराची साथ आल्यामुळे प्रवितादी क्रमांक ५ अ हे न्यायालयता उपस्थित राहु शकले नाही. सदर कारण संयुक्तिक आहे. तसेच वादी व प्रतिवादीं यांच्या मधील वादाचे निराकारण गुणावगुणांवर होण्याकरिता प्रतिवादी क्रमांक ५ अ यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश रदद करणे नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ५ अ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2025.09.25 17:05:32 +0530

स्थळः— इगतपुरी

दिनांकः— २५/०९/२०२५

( मो. द. ननवरे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.